सौ. वंदना राजीव नाबर

304, रवि-किरण

तेजपाल स्कीम रोड - 1

विलेपार्ले (पूर्व)

400057.

23/07/2015

प्रति,

श्री. प्रसाद पाटील,

निवारा डेवलपर्स,

विलेपार्ले,

श्री. प्रसाद पाटील,

यांस नमस्कार.

आम्ही गेल्या महिन्यात आपण डेवलप केलेल्या नविन जागेत राहण्यास आलो, फ्लॅट मध्ये येताच आमचे मन पुढील गोष्टींमुळे उल्हसित झाले, यासंबंधी आपले आभार मानण्याकरिता, या पत्राचा उद्देश आहे.

1) भरपूर उजेड व मोकळी हवा येण्यास केलेल्या व्यवस्थेमुळे फ्लॅट मध्ये येताच प्रसन्न वाटते. आरोग्य चांगले राहण्यास त्यामुळे खूपच मदत होइल. एक पवित्रता निर्माण होते, व झाली आहे असे वाटते. व आमच्याकडे कृष्णकृपेने कृष्णकार्य चालते व त्यामुळे कृष्णाने "प्रसाद" रुपी प्रासाद आम्हाला प्रसाद पाटील-च्या हातून दिला हे मी अंतःकरणपूर्वक प्रेमाने सांगत आहे.

2) फ्लॅट मध्ये वापरण्यात आलेले सामान उत्तम दर्जाचे आहे यात संशय नाही.

3) फ्लॅटची मांडणी सर्व ठिकाणी त्वरित पोचण्यास सोयीची आहे.

सर्वतऱ्हेने फ्लॅट सुंदरच झाला आहे व म्हणून आम्ही अतिशय आनंदी झालो आहोत, तसेच वेळेवर फ्लॅट मिळाला याचाही आनंद झाला. सोसायटीला O/C (occupancy certificate) मिळाले, इतक्या लवकर मिळाले, हे आपण केलेल्या उत्तम कामाची पोच आहे असे मला वाटते. आपणांस व आपल्या सर्व कार्यकारी ऑफिस कार्यकर्त्यांचाही धन्यवाद. सर्वांच्या मदतीने, मेहनतीनेच सर्व कार्य सुंदर घडते, शकेरा व इतर सर्वांनी वेळोवेळी आम्हाला तत्परतेने प्रश्न सोडविण्यास मदत केली, त्या सर्वांस हृदयापासून नमस्कार, मातीचे ट्रक नेणाऱ्यापासून, वीटा लावणाऱ्या वायरींग करणाऱ्या, लिफ्ट लावणाऱ्या, वॉचमनना सर्वांना धन्यवाद.

आपली नम्र,

सौ. वंदना नाबर.